# पालखी

अभिनवचा परिसरच विठ्ठलनामाच्या गजरात दुमदुमुन गेला होता. वारकरी पोशाखात आलेले आमचे छोटे बालगोपाल अभिनवची पालखी घेऊन निघाले आधी विद्याताईंनी पादुकांची पूजा केली. नंतर पालखी घेऊन छोटे वारकरी निघाले. विठ्ठल नामाच्या गजरात भजन म्हणत फुगड्या खेळत वारकरी आनंदाने नाचत होते. पालखी फिरून परत शाळेत आली. विद्याताई, माधुरी ताईंनी पालखी आणि वारकऱ्यांचे औक्षण केले. सर्वांना बुक्का लावून चुरमुरे, साखर फुटाण्याचा प्रसाद देण्यात आला.



